# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-८१ दिनांक - ०७/०३/२०२४

## प्रेसनोट

## खुनाच्या गुन्हयामध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत असतांना पॅरोल रजेवरुन २०१७ पासुन पळुन गेलेल्या आरोपीतास ७ वर्षांनी अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा यांना यश

काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ८३/२०१० भा.दं.वि.सं.कलम ३०२,४५२,५०४ अन्वये दाखल गुन्ह्या मध्ये मा. ठाणे न्यायालयाने आरोपीत यकीनअली नासीरअली शेख वय ३६ वर्षे, रा. गौरव संकल्प फेज ४, रुम नं. ४०२, रवी गृप, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे यास जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. सदर आरोपीत हा कळंबा मध्यवर्ती कारागृह कोल्हापुर येथे शिक्षा भोगत असताना तो सन २०१७ मध्ये अभिवचन रजेवर सुटलेला होता. अभिवचन रजा संपल्यानंतर दिनांक १८/०२/२०१७ रोजी १७.०० वाजता कळंबा कारागृह, कोल्हापुर येथे रजेवरुन हजर होणे असतांना देखील तो कोल्हापुर कळंबा कारागृहात हजर न होता पळुन गेलेला होता. त्याचे विरुध्द पो.शि. राजु नारायण शिंदे नेमणुक कळंबा कारागृह जिल्हा कोल्हापुर यांनी दिले फिर्यादी वरुन काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा रजी नं. ८५/२०१७ भादवीस कलम २२४ प्रमाणे दि. २७/०२/२०१७ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

मा. पोलीस आयुक्त सो, मा अपर पोलीस आयुक्त सो व मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) सो यांनी मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात क्षेत्रात गुन्हयातील पाहीजे व फरारी आरोपीताचा शोध घेवुन अटक करण्याबाबत आदेश दिले होते. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा मार्फत तपास करीत असताना पो.हवा. पुष्पेंद्र थापा यांना मिळालेल्या माहीतीप्रमाणे तपास करण्यात आला.

सदर गुन्हयांतील फरारी आरोपीत यकीनअली नासीरअली शेख याची माहीती काढुन त्याचा शोध घेत असताना सदर आरोपीत आज दिनांक ०७/०३/२०२४ रोजी मिळुन आलेला आहे. त्यास त्याचे नांव विचारता त्याने आपले नांव यकीनअली नासीरअली शेख वय ४६ वर्षे, सध्या रा. सन क्लब बिल्डींग, ए विंग, रुम नं. १०८, सफारी हॉटेलच्या मागे, काशिगांव, ता.जि. ठाणे. मुळ रा. राजेश कम्पौंड नाशिर अलि चाळ, रुम नं. ०१, दहिसर पुर्व, मुंबई आधार कार्ड नं. ७३६० ३२३८ ७६२५ असे सांगीतले आहे.

आरोपीत यास ताब्यात घेवुन त्यास पुढील कायदेशीर कारवाई कामी काशिमीरा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील

पो.निरी अविराज कुराडे, सपोनिरी कैलास टोकले. सपोनिरी प्रशांत गांगुर्डे, सपोनिरी पुष्पराज सुर्वे, सफौ संदीप शिंदे, पोहवा/०००२३ संतोष लांडगे, पोहवा/०००२४ पुष्पेंद्र थापा, पो.हवा./०६०३४ सचिन हुले, पोहवा/०६०३७ सचिन सावंत, पो.हवा./०६०९२ विजय गायकवाड, पो.हवा/०८०११ समिर यादव, पो.हवा/१००४९ सुधीर खोत, पो.कॉ./०७११५ प्रशांत विसपुते, पो.कॉ./१४०१४ सनी सुर्यवंशी, १) पोशि/२३०१७ गौरव बारी २) पोशि/२३३२५ सौरभ इंगळे, मसुब/ किरण आसवले, सफौज. सतोष चव्हाण सायबर विभाग यांनी केली आहे.



-------ooooo-------